**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**परिवहन समिती**

ठराव क्र. दिनांक. / /२०१५

---

प्रस्तावाचा विषयः- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८ नुसार परिवहन उपक्रमाचे सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसकंल्पासह सन २०१५-१६ चे मुळ अंर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन मा. महासभेपुढे समितीपुढे सादर करणेस शिफारस करणे.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९७ नुसार परिवहन उपक्रमाचा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज सोबत सादर करित असून तद्नुसार याच अधिनियमाचे कलम ९८ प्रमाणे २०१४-१५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१५-२०१६ चे अंदाज पत्रक "ब" मा. परिवहन समितीने तयार करुन मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यास शिफारस होणेस विनंती आहे.

निर्णय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९७ नुसार आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांनी सादर केलेल्या माहिती, प्रस्ताव व अंदाजाबाबत विचार विमर्ष व आवश्यक ते खालील फेरबदल करुन याच अधिनियमाचे कलम ९८ (३) नुसार २०१४-१५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ चे अंदाज पत्रक "ब" तयार करुन मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यास शिफारस केली आहे.

१) विनातीकीट प्रवास सवलतीसह शालेय विद्यार्थी, अंध - अपंग व आवश्यकतेनुसार त्यांचे सोबती, जेष्ठ नागरीक, यांना बस प्रवास भाड्यापोटी देण्यात येणाऱ्या सवलतीकरीता अभिकर्त्यास खर्चाची प्रतिपुर्ती देणेच्या तरतुदी संदर्भाने धोरण ठरवणेस शिफारस करणेत आली व याबाबतचे अर्थसंकल्पीय लेखाशिर्षात दुरुस्ती करणेत आली.

२) इतर अनुषांगीक खर्चामधील कर्जाच्या मुद्दल परतफेडीची व कर्जावरील व्याज परतफेडीची महसुली व भांडवली तरतुद स्वतंत्र दर्शविणेत आली.

३) जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजने अंतर्गत प्राथमिक टप्प्यात खरेदी करावयाच्या २२० बसेस या सुधारीत मंजुर प्रस्तावातील ३४६ बसेस पैकी असल्याचे नमुद करणेत आले.

४) उपराक्त फेरफाराअंती मा. परिवहन समितीने शिफारस केलेल्या सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**(₹ लाखात)**

| **अ.क्र.** | **लेखाशिर्ष** | **मा. परिवहन समितीने शिफारस केलेले अंदाज** | |
|---|---|---|---|
| | | **सुधारित अर्थसंकल्प सन २०१४-२०१५** | **मुळ अंदाज सन २०१५-१६** |
| १ | जमा रकमा | ₹ १००९.८३ | ₹ १४९०७.६९ |
| २ | खर्च रकमा | ₹ १००८.८२ | ₹ १४९०६.६८ |

सुचकाचे नाव :- श्री.

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- श्री.

व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- प्रतिकुल संख्या :- तटस्थ संख्या:-

ठराव सर्वानुमते मंजूर

( )

सभापती तथा पिठासीन प्राधिकारी

परिवहन समिती

वसई विरार शहर महानगरपालिका